**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८**
**मा. फ प्रभाग समिति**
**कार्यपत्रिका क्रमांक –०८**
**सभावृत्तांत**

दिनांक :– ०५/१२/२०१९ वेळ :- स.११.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. फ प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक ०५/१२/२०१९ रोजी स. ११.३० वा.फ प्रभाग कार्यालयाचे "राजर्षी शाहू महाराज" सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. योगिता ज्ञानेश्वर नागरगोजे | सभापती |
| २. | मा.कुंदन अंबादास गायकवाड | सदस्य |
| ३. | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | सदस्य |
| ४. | मा.साधना अंकुश मळेकर | सदस्य |
| ५. | मा.संजय बबन नेवाळे | सदस्य |
| ६. | मा. भालेकर प्रविण महादेव | सदस्य |
| ७. | मा. संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे | सदस्य |
| ८. | मा. दिनेश लालचंद यादव | नामनिर्देशित सदस्य |
| ९. | मा.पांडुरंग गुलाब भालेकर | नामनिर्देशित सदस्य |

याशिवाय खालील अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. वामन नेमाणे - प्रशासन अधिकारी, मा.श्रीकांत सवणे-कार्यकारी अभियंता(स्थापत्य्), मा. प्रवीण घोडे-कार्यकारी अभियंता(विद्युत), मा. मोहन निकम-लेखाधिकारी, मा. सतिश वाघमारे- उपअभियंता (स्थापत्य), मा. हनुमंत शिंदे - उपअभियंता (स्थापत्य), मा. शहाजी गायकवाड-उपअभियंता (पा.पु.),मा. किशोर महाजन-उपअभियंता(जलनि:स्सारण), मा.सुनिल शिंदे-उपअभियंता नगररचना, मा.जाधव व्ही.के.-उपअभियंता (स्थापत्य उद्यान),मा.अजय सुर्यवंशी-उपअभियंता(ईडब्ल्यूएस-स्थापत्य्),मा.खोंद्रे मोहन ईश्वरा-उपअभियंता(झोनिपु स्थापत्य्) , मा.डी.जे.शिर्के-सहाय्यक आरोग्याधिकारी, श्री कोंढरे एस.आर. व श्री पी.बी.वाघमोडे-अतिक्रमण अधिक्षक,श्री चव्हाण अे.अे.कनिष्ठ् अभियंता(जलनि:स्सारण),श्रीमती प्राजक्ता गव्हाणे-कनिष्ठ अभियंता (स्थापत्य् उद्यान), श्री कोटीयाना डी.एम.-आरोग्य निरिक्षक (पशुवैद्यकिय विभाग), श्री सुरेश घोडे-उद्यान सहाय्यक, वृक्षसंवर्धन विभाग, श्री डी.जी.कांबळे-उद्यान सहाय्यक.

सभापती मा. योगिता ज्ञानेश्वर नागरगोजे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाज सुरु करणेस अनुमती दिली.

सभेचे सुरुवातीस दापोडी येथील जलनि:स्सारण वहिनीचे खोदकाम करीत असताना रविवार दिनांक १/१२/२०१९ रोजी श्री नागेश जमादार, मजूर यांचा अपघाती मृत्यु झाल्याने तसेच याच कामकाजामध्ये मदतकार्य करीत असताना महानगरपालिकेचे अग्निशमन विभागाचे कर्मचारी श्री विशाल जाधव यांचा अपघाती मृत्यू झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत आली.

Scanned with CamScanner

मा.सभापती व उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने सभेत खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक-२ मा.योगिता नागरगोजे,सभापती यांचा दिनांक ५/१२/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

फ प्रभाग समिती सदस्यांचा स्वच्छ भारत अभियात अंतर्गत राजस्थान अभ्यास दौरा कालावधी दि.३०/१/२०२० ते दिनांक ३/२/२०२० चे अभ्यास दौ-यास तसेच याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेबाबत.

वरीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

---

अ) दि. 07/11/2019 रोजी स.11.15 वा. झालेल्या मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक 06) कायम करणेत येत असल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दि. 07/11/2019 रोजी स.11.30 वा. झालेल्या मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक 07) कायम करणेत येत असल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

विषय क्र - १
ठराव क्र. - ९
दिनांक - ०५/१२/२०१९
विभाग – सदस्य प्रस्ताव
सुचक- मा.योगिता नागरगोजे
अनुमोदक- मा.प्रविण भालेकर

संदर्भ-१.मा.क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.फक्षेका/प्रशा/१/कावि/१२५/२०१९ दि.१/२/२०१९.
२.मा.फ प्रभाग समिती सभा ठराव क्रमांक ६ दिनांक ४/७/२०१९

फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. 11 मधील विविध प्रकल्पांचे नामकरणाबाबत मा. फ प्रभाग समिती ठराव क्र. 19 दि. 04/12/2018 अन्वये सन्मा. प्रभाग समिती सदस्यांमार्फत ठेवलेला विषय सर्वानुमते मान्य करणेत आलेला असुन सदर ठरावान्वये घरकुल प्रकल्प कमान (प्रवेशद्वार)- १) लोकनेते गोपीनाथ मुंडे नगर २) समस्त नेवाळे मळा प्रवेशद्वार असे नामकरण करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

फेडरेशन ऑफ घरकुल सहकारी गृहरचना संस्था मर्या. चिखली, भारिप बहुजन महासंघ व संविधान दिन सोहळा समिती यांनी दि. 01/01/2019 चे पत्रानुसार घरकुल प्रकल्प कमानीचे नामकरणास विरोध दर्शविला आहे.

दिनांक 23/01/2019 रोजी आपले सरकार वेबपोर्टलवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने केलेला ठराव दुरुस्त करुन घरकुलचे नामकरण हे प्रचलित नावाप्रमाणेच घरकुल नवनगर संकुल करण्यात यावे अशी तक्रार दाखल केली आहे.

तसेच भगवानबाबा प्रतिष्ठाण – मोरवाडी, जयभगवान महासंघ - पिंपरी चिंचवड परिवर्तन पार्टी पिंपळे गुरव या यांनी दि. 16/01/2019 चे पत्रान्वये घरकुल प्रकल्पाचे "स्व. गोपीनाथ मुंढे नगर" नामकरण करणेबाबत समर्थन केलेले आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे काही संस्थांनी विरोध दर्शविला असून काही सस्थांनी सहमती दर्शविलेली आहे. तरी सदरचा घरकुल नामकरणाबाबतचा विषय नजीकच्या मा. प्रभाग समिती सभेमध्ये अवलोकनार्थ सादर करणेत यावा.

सदर विषयाबाबत सांगोपांग चर्चा झाली असता सदरचा विषय माहे जानेवारी २०२० चे फ प्रभाग समितीचे मासिक सभेपर्यंत तहकूब करणेत यावा असे सर्वानुमते ठरले.

सदर विषय सर्वानुमते तहकूब करणेत आला.

---

Scanned with CamScanner

यानंतर खालीलप्रमाणे ऐनवेळेसचे विषय चर्चेसाठी घेणेत आले.

विषय क्र - २
दिनांक - ०५/१२/२०१९
सुचक- मा.स्वीनल म्हेत्रे

ठराव क्र. - १०
विभाग – सदस्य प्रस्ताव
अनुमोदक- मा.कुंदन गायकवाड

संदर्भ-१.मा.योगिता नागरगोजे-सभापती यांचा दिनांक ५/१२/२०१९ रोजीचा अर्ज.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत फ प्रभाग समिती सदस्यांना जयपूर, उदयपूर(राजस्थान) महानगरपालिकेने राबविलेल्या कचरा विल्हेवाट, शाळांमधील स्वच्छता प्रकल्प्, पर्यटन स्थळांवरील स्वच्छता नियोजन इ.प्रकल्पांची पाहणी करणोमी फ क्षेत्रिय् समिती सदस्य् व् फ क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी यांचेकरिता जयपूर उदयपूर(राजस्थान) महानगरपालिका येथे पाहणी करणेकामीचे दौ-यास व त्याकामी प्रत्यक्ष होणा-या खर्चास प्रभाग समितीची मान्यता देणेत येत आहे तसेच त्यासाठी येणा-या खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेकामी विषय कायम होणेची वाट न पाहता सदरचा विषय मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर विषय सर्वानुमते मान्य झाला.

------------------------------------

यानंतर मा. सभापती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

(योगिता नागरगोजे)
सभापती
फ प्रभाग समिती
निगडी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय,निगडी ४४
क्र.फक्षेका/सभा/कावि/ ५४/२०१९ दिनांक ११ /१२/२०१९.

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
फ प्रभाग समिती
निगडी.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Scanned with CamScanner